Registered with Registrar of News papers for India Under Reg. 70573/99

## इतिहास संशोधन मंडळाची विक्रीसाठी प्रकाशने

| | |
|---|---|
| १. जुन्या मासिक त्रैमासिकांत प्रसिद्ध झालेली महाराष्ट्रेतिहासाची साधने विभाग दुसरा इ.स. १५०२ ते १७५० प्रास्ताविक, सूची वगैरे - संपा. श्री वा. सी. बेंद्रे | रु. २५.०० |
| २. दक्खनी हिंदीतील इतिहास - श्री. दे. व्यं. चौहान | रु. २५.०० |
| ३. ऐतिहासिक सनदा व पत्रे - संपा. श्री. मा. भि. पोतदार | रु. २५.०० |
| ४. पेशवे सवाई माधवराव यांची पत्नी यशोदाबाई हिचा तोतया - श्री. आशीष प. देसाई | रु. २५.०० |
| ५. कोकणचा राजकीय इतिहास (इ.स. पूर्व ते इ.स. १८२०) - डॉ. वि. गो. खोबरेकर | रु. १९०.०० |
| ६. मराठेकालीन कोकणचे सामाजिक व आर्थिक जीवन - डॉ. वि. गो. खोबरेकर | रु. १२५.०० |
| ७. २०व्या शतकातील मुंबईची वाटचाल व जुलै २००५ मधील जलमय मुंबईची करुण कहाणी, जाने २००६ - डॉ. वि. गो. खोबरेकर | रु. [illegible] |

• • •

**पत्रव्यवहारासाठी पत्ता :**
संचालक,
इतिहास संशोधन मंडळ,
१७२, मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय मार्ग,
दादर (पूर्व), मुंबई - ४०० ०१४.
दूरध्वनी : ०२२ - २४१५८२६१
Email : mandalitihas@gmail.com

संपादक व प्रकाशक : डॉ.श्री. प्र. सा. खोबरेकर यांनी इतिहास संशोधन मंडळाच्या मालकीचे त्रैमासिक मुद्रक "विजया प्रिंटस्", ६/३१२, कोहिनूर कंपाऊंड, म. जोतीबा फुले मार्ग, नायगांव, दादर, मुंबई - १४. येथे छापून, १७२, मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय मार्ग, दादर, मुंबई - १४. येथे प्रसिद्ध केले.

ISSN 2250 - 1185

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृति मंडळाने पुरस्कार दिलेल्या

मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालयाचे

इतिहास संशोधन मंडळ

स्थापना २४ जून १९५६

# भारतीय इतिहास आणि संस्कृति

## त्रैमासिक

(वर्ष : ५४) जानेवारी - मार्च २०१८ (पुस्तक : २१६)

# ३. महात्मा फुले आणि त्यांच्या साहित्यातील सामा‍ि

लेखिका : डॉ.नलिनी व.

भ्रमणध्वनी : ९९७५८३३७४८

**महात्मा ज्योतीराव फुले यांचे साहित्य**

१) समाज परिवर्तनाच्या कार्याप्रमाणेच महात्मा फुलेंचे वाङ्मयीन योगदानही महत्त्वाचे ठरते. त्यांनी वाङ्मयीन निर्मिती करून त्याद्वारे समाज प्रबोधन करण्याचे कार्य केले. त्यांनी समाज व धर्मसुधारणा स्त्रियांचा उद्धार, अस्पृश्यता आणि शेतकऱ्यांची स्थिती यासंबंधीचे विचार गद्य-पद्यात्मक ग्रंथात व्यक्त केले. त्यांनी लिहिलेल्या ग्रंथापैकी 'गुलामगिरी' (१८७३), 'शेतकऱ्याचा असूड' (१८८३) 'इशारा (१८८५) , 'सत्सार अंक १ व २' (१८८५), 'सार्वजनिक सत्यधर्म पुस्तक' (१८८९) हे गद्य लेखन, तर 'शिवाजी महाराजांचा पवाडा (१८६९), 'ब्राह्मणाचे कसब' (१८६९) व 'अखंडादी रचना' असे पद्यलेखन केले.

जोतीराव फुल्यांच्या लेखनकार्याला १८५५ मध्ये प्रसिद्ध झालेल्या 'तृतीय रत्न' (नाटक) या छोट्या वाङ्मय कृतीपासून प्रारंभ झाला. त्यांच्या समाजकार्याला १८४८ साली त्यांनी शुद्रातिशुद्रांसाठी काढलेल्या मुलींच्या शाळेपासून प्रारंभ झाला असे स्थूलमानाने म्हणता येईल.

ब्राह्मणभट भिक्षूक, गरीब समाजातील लोकांना कसे लुबाडतात, हा विषय 'तृतीय रत्न' या नाटकात आला आहे.

२) 'तृतीय रत्न' या नाटकानंतर १४ वर्षांनी जोतीरावांचा 'पवाडा-छत्रपती शिवाजी राजे भोसले' यांचा, हा ग्रंथ लोकहितार्थ सन १८६९साली प्रसिद्ध झाला.

या पोवाड्याचे आठ भाग आहेत आणि त्यात छत्रपतींच्या लोकोत्तर कार्याचा उल्लेख केला आहे. समाज शिक्षणासाठी 'पवाडा' हे माध्यम, शिवरायांचे चरित्र सांगण्यासाठी जोतीरावांनी जाणीवपूर्वक वापरलेले दिसते. हा पवाडा रचताना त्यांनी उपलब्ध जुने साहित्य ही विचारात घेतले होते, असे दिसते.

छत्रपतींच्या जीवनातील सर्व प्रमुख घटनांचा, व्यक्तींचा, गडकोटांचा असा बारीकसारीक तपशील या पवाड्यात आला आहे. यावरून शिवचरित्राचा त्यांनी किती अभ्यास केला होता याची कल्पना येते.

आपल्या प्रस्तावनेत ते पुढे म्हणतात, 'कुणबी, माळी, महार, मांग वगैरे पाताळी घातलेल्या क्षत्र्यांच्या (क्षत्रियांच्या) उपयोगी हा पवाडा पडावा, असा माझा हेतू आहे.

३) यानंतरचा महत्त्वाचा ग्रंथ म्हणजे 'ब्राह्मणांचे कसब' (१८६९) लोकहितार्थ तयार केलेले हे लहानसे पुस्तक जोतीरावांनी 'महाराष्ट्र देशातील कुणबी, माळी, महार, मांग यांना परमप्रीतीने' नजर केले आहे.

या लेखनाचा हेतू सांगताना जोतीराव म्हणतात की, 'ब्राह्मण आपला कावा सर्व जातीच्या लोकांच्यासारखा चालवीत नाहीत. कुणबी, माळी वगैरे शुद्र जातींवर त्यांचे भटपण फार चालते. परंतु अशी गोष्ट शुद्र जातीत नाही. तेथे अद्याप बाजीरावाच्या वेळची भटशाही राज्य करीत आहे.

दुसरा एक हेतू हा आहे की, आमच्या समदृष्टी इंग्लिश सरकारने आपल्या प्रजेतील ह्या अतिउपयोगी वर्गास विद्या शिकवावी व तिच्या योगे त्यांचे डोळे उघडून त्यांस भटांच्या दास्यातून मुक्त करावे.' हा ग्रंथ काव्यरूपाने सादर केला आहे. ब्राह्मण, शुद्राच्या घरी काही काम असले, बालकाचा जन्म, विवाह, पितृशांती, पोथी वाचन, अंतकाळ अथवा मृत्युप्रसंगी, सणाचे प्रसंग तर तेथे जाऊन कशी लूटमार करता याचे काव्यात वर्णन करून जोतीराव म्हणतात.[१]

'विद्याहीन शुद्र लज्जाहीन झाला
जोडा सांभाळिला ब्राह्मणाचा
हातातील जोडे मधी टाकू नका
शोध करा नीका जोति म्हणे

४) महात्मा फुले यांनी लिहिलेला पहिला गद्य ग्रंथ म्हणजे 'गुलामगिरी' हा होय. म.फुले यांच्या समाजक्रांतीचे मूळ तत्त्व सांगणारा त्यांचा हा ग्रंथ अत्यंत महत्त्वाचा आहे.

प्रत्येक व्यक्तीला आपल्या मर्जीप्रमाणे जगण्याचा हक्क आहे पण त्यावर कोणी बंधने घातली म्हणजे एक प्रकारे मरण पत्करणे होय. हा विचार जोतीरावांच्या मनात पक्का रुजला होता. अशा या जगण्यालाच ते 'गुलामगिरी' समजतात.



या पुस्तकाची अर्पणपत्रिका ही अत्यंत सूचक असून या पुस्तकात जे विवेचन केले आहे त्याच्याशी ती अर्पणपत्रिका एक प्रकारे संबंधित अशीच आहे. या अर्पणपत्रिकेत ज्योतीराव म्हणतात.

''युनायटेड स्टेट्समधील सदाचारी लोकांनी गुलामास दास्यत्वापासून मुक्त करण्याच्या कामात औदार्य, निरपेक्षता व परोपकार बुद्धी दाखविली वास्तव त्यांच्या सन्मानार्थ हे लहानसे पुस्तक त्यांस परम प्रीतीने नजर करितो आणि माझे देश बांधव त्या स्तुत्य कृत्याचा कित्ता आपले शुद्र बांधवास ब्राह्मण लोकांच्या दास्यत्वापासून मुक्त करण्याच्या कामात होतील अशी आशा बाळगतो.[२]

या पुस्तकाची प्रस्तावनाही अत्यंत महत्त्वाची आहे. या पुस्तक लेखनाच्या हेतूसंबंधी ज्योतीराव लिहितात. या ग्रंथाचा मुख्य उद्देश असा आहे की, आज शेकडो वर्ष शूद्रादि, अतिशूद्र, ब्राह्मण लोकांचे राज्य झाल्यापासून सतत दु:खे सांगत आहेत व नाना प्रकारच्या यातनेत आणि संकटात दिवस काढीत आहेत. तर या गोष्टीकडेस त्या सर्वांचे लक्ष लागून त्यांनी तिजविषयी नीट विचार करणे व येथून पुढे भट ब्राह्मण लोकांचे अन्याय जुलमांपासून आपली सुटका कशी करून घेणे हाच काय तो आहे.

या देशात भट लोकांचे राज्य होऊन सुमारे तीन हजार वर्षांपासून अधिक काळ लोटून गेला असावा असे अनुमान होते. ते लोक परकीय देशातून येऊन या देशातील मूळचे राहणारे लोकांस त्या सर्वांना त्यांनी आपले दास केले व त्यास अनेक तऱ्हेची क्रुर शासने दिली.

धोंडीबा आणि ज्योतिबा यांच्या प्रश्नोत्तरातून 'गुलामगिरी हा ग्रंथ प्रसिद्ध झाला आहे. ब्राह्मणी धर्माचे शोषक रूप उघड करणे आणि इतिहास काळातील संस्कृती संघर्ष ध्वनित करणे हा या ग्रंथाचा प्रधान हेतू आहे.[३]

शुद्रातिशुद्रांना गुलामी सदृष्य परिस्थिती का प्राप्त झाली आणि त्यांच्या वाट्याला एवढे दु:खद जीवन का आले, याचा ते या ग्रंथातून शोध घेत आहेत.

प्रस्तावनेच्या शेवटी ज्योतिरावांनी प्रचलित इंग्रजी सरकारला या परिस्थितीकडे लक्ष देऊन अशी विनंती केली आहे की, ''त्यांनी दयाळू होऊन या गोष्टीकडेच

नीट रीतीने लक्ष पुरवावे व त्यांस भट लोकांचे मानसिक दास्यत्वापासून मुक्त करावे अशी आम्ही आपले जगन्नियंत्याजवळ शेवटची प्रार्थना करितो.''

५) शेतकऱ्यांचा असूड (१८८३)

या ग्रंथाच्या रचनेसाठी ज्योतिरावांनी इंग्रजी, संस्कृत प्राकृत ग्रंथाचे वाचन केले होते. एखादे प्रकरण लिहून झाले की ज्योतिराव आपल्या मित्रांना, सहकाऱ्यांना वाचून दाखवीत, त्यांची मते जाणून घेत, शुद्रादी, अतिशुद्रांच्या दीनवाण्या स्थितीवरून आणि येथील शेतकऱ्यांच्या खालावलेल्या स्थितीचे प्रत्यक्ष अवलोकन करून ज्योतिरावांनी या ग्रंथाची रचना केली आहे. शेतकरी हा शब्द आपण कोणत्या अर्थाने वाचला आहे हे ज्योतिरावांनी स्पष्ट केले आहे.

सांप्रत शेतकरी म्हटले म्हणजे त्यामध्ये तीन भेद आहेत. शुद्र शेतकरी अथवा कुणबी, माळी व धनगर. मूळचे जे लोक शुद्ध शेतीवर आपला निर्वाह करू लागले ते कुळवाडी किंवा कुणबी. जे लोक आपले शेतीचे काम सांभाळून बागायती करू लागले ते माळी. जे हे दोन्हीही करून मेंढरे बकरी यांचे कळप बाळगू लागले ते धनगर.

'शेतकऱ्याचा आसूड' या ग्रंथात प्रामुख्याने हिंदुस्थानातील अज्ञानी व देव भोळ्या शुद्र शेतकऱ्यांची स्थिती त्यांचे प्रश्न, शेतीसंबंधीच्या समस्या, त्याच्या मार्गातील अडथळे यांची तर्कनिष्ठ चर्चा केली आहे.[४]

शिक्षण नसल्यामुळेच शुद्रातिशुद्रांचे शोषण होत आहे. हे महात्मा फुले यांनी अनेक ठिकाणी लिहिले आहे. 'शेतकऱ्याचा आसूड' या उपोद्घातातील

''विद्येविना मती गेले, मती विना नीती गेली,
नीती विना गती गेली, गती विना वित्त गेले,
वित्ताविना शुद्र खचले, इतके अनर्थ एका अविद्येने केले.''

हे सूत्रबद्ध विवेचन त्यांचा शिक्षणविषयक दृष्टिकोन प्रकट करतो. हंटर आयोगापुढे साक्ष देताना बहुजनांच्या शिक्षणाला प्राधान्य देणे कसे गरजेचे आहे. हेही त्यांनी सांगितले आहे.

शेतकऱ्यांच्या दु:खद स्थितीची कारणमीमांसा करताना समकालीन जीवनामध्ये त्यांना काही कारणे सापडतात. त्यातील अत्यंत महत्त्वाचे कारण



म्हणजे शेतकऱ्याची विद्याहिनता व त्याचा फायदा घेणारे ब्राह्मण ही दोन कारणे त्यांना अतिशय महत्त्वाची वाटतात.

कुठल्याही प्रकारची विद्या नसल्यामुळे पुरोहित सांगतील तोच धर्म, असे शेतकऱ्यास वाटते आणि याचाच फायदा घेऊन हा पुरोहित वर्ग त्याचे वाटेल तसे शोषण करतो.

ब्राह्मणेतरांच्या शिक्षणावर बंदी घातल्यामुळे हा वर्ग अशिक्षित राहिला. ही बंदी हजारो वर्षे चालत राहिल्याने हे लोक अडाणी बनत गेले. अज्ञान एवढे पसरले की, त्यांच्यामध्ये एखाद्या विषयावर तर्कशुद्ध पद्धतीने विचार करण्याची कुवतच राहिली नाही. त्यामुळे कोणी काही खरे खोटे सांगितले तरी या लोकांचा सहजपणे त्यावर विश्वास बसे. यातून अंधश्रद्धा पसरविणे सोपे झाले. तेव्हा या बहुसंख्य लोकांचा धर्मभोळेपणा आणि त्यांच्या अंधश्रद्धा यांचे मूळ फुलेंच्या मते त्यांच्या अज्ञानात होते. म्हणून फुलेंनी लोकांचे अज्ञान घालविले.[५]

सरकारची ध्येयधोरणे (उदा.वनविभागाची निर्मिती), इंग्रजांचा आहारविहार (उदा.बैल मारून खाणे), बालविवाह आणि बहुविवाहासारख्या परंपरा, गावातील पाटील वगैरे दांडग्यांची लुटालुट यांसारख्या आणखी ही काही कारणांचा ते निर्देश करतात.

शेतकऱ्यांची त्याच्या अशा या जीवनातून मुक्तता करण्याचे काही मार्गही महात्मा फुले सुचवितात. त्यात प्रामुख्याने शेतकऱ्यांच्या मुलांना विद्या शिकवणे गरजेचे आहे असे त्यांना वाटते. येथे आणखी एक फार महत्त्वाची गोष्ट ते निर्देशित करतात. औपचारिक शिक्षणाबरोबर शेतीचे शिक्षणही दिले पाहिजे असे त्यांना वाटे.

शेती सुधारणा होणेही त्यांना गरजेचे वाटते. त्यातून ठिकठिकाणी तलाव बांधण्याची शिफारस ते करतात. म्हणजे केवळ शेतकऱ्यांची दु:स्थिती सांगून ते थांबत नाहीत तर त्यावरील उपाययोजनाही ते सांगतात हे महत्त्वाचे आहे.

थोडक्यात असे सांगता येईल की, व्यक्तिमत्त्वाचा आविष्कार करण्यात समर्थ असलेली अशी महात्मा फुले यांची स्वतंत्र शैली आहे. वक्तृत्व,

चिंतनशीलता, संवादात्मकता, काव्यात्मकता, सहजता, अर्थवाही लेखन आणि बोलीचा अवलंब ही फुलेंच्या लेखनशैलीची वैशिष्ट्ये म्हणून सांगता येतील. शेतकऱ्यांचा असूड ह्या ग्रंथातून त्यांच्या या शैलीचा प्रत्यय येतो.

एकूण आशय आणि लेखनशैली या दोन्ही दृष्टींनी शेतकऱ्याचा आसूड हा ग्रंथ वैशिष्ट्यपूर्णच नव्हे तर सामाजिक इतिहासाच्या संदर्भात आणि वाङ्मयीन इतिहासाच्या संदर्भात अत्यंत महत्त्वाचा आहे, हे नोंदवणे भाग पडते.

६) १८८५ साली 'सत्सार' नावाचे एक नियतकालिक सूरु केले. त्याचे फक्त दोनच अंक निघाले. यात स्त्रियांच्या प्रश्नांचे विचार संवाद रूपाने मांडले आहेत.

याच वर्षी लिहिलेल्या इशारा या लेखात जाती व्यवस्था आणि शुद्र शेतकऱ्यांची स्थिती हल्ली बरी झाली या दोन विधानांचा परामर्श ज्योतिरावांनी घेतला आहे.

स्वातंत्र्य, समता, मानवी हक्क, विश्वबंधुत्व या विचारांचा प्रचार करणे हे ज्योतिरावांचे जीवित कार्य होते.

७) ज्योतिराव सतत सत्याचा पाठपुरावा करीत असता ते ब्राम्हणांच्या सामाजिक व सांस्कृतिक श्रेष्ठत्वाला विरोध करण्याचे काम सातत्याने करीत राहिले. १८७३ साली त्यांनी 'सत्यशोधक समाजाची' स्थापना केली आणि आपल्या लेखनाच्या, प्रचारांच्या माध्यमांतून त्याचा जोरदार प्रचार केला.

सर्व साक्षी जगत्पती, त्याला नकोच मध्यस्थी हे ज्योतिरावांच्या सत्यशोधक समाजाचे ब्रीदवाक्य होते. या समाजाच्या मार्गदर्शनासाठी १८८७ साली ज्योतिरावांनी 'सत्यशोधक समाजोक्त मंगलाष्टकांसह सर्व पूजाविधी प्रारंभ' हे पुस्तक लिहिले. विवाह विधीविषयक कर्मकांडावर प्रस्तुत पुस्तकात टीका करण्यात आली आहे.

८) सार्वजनिक सत्यधर्म पुस्तक (१८९१) हा महात्मा फुले यांचा शेवटचा ग्रंथ, आपल्या तत्त्वप्रणालीचे सार सांगणाऱ्या या महत्त्वपूर्ण ग्रंथाची रचना त्यांनी आपल्या प्रकृतीच्या मोठ्या दयनीय अवस्थेत केली.



या ग्रंथात निरनिराळ्या २८ प्रमुख विषयांवर आणि (त्यामुळे होणारे सामान्य जनतेचे शोषण ज्योतिरावांना मान्य नव्हते) त्यातील काही उपविषयांवर सखोल चिंतन केले आहे.

धर्म विधीचे कर्मकांड आणि त्यामुळे होणारे सामान्य जनतेचे शोषण ज्योतिरावांना मान्य नव्हते. विश्वकुटुंब वादाचे सम्यक स्पष्टीकरण सांगणारा 'सार्वजनिक सत्यधर्म पुस्तक' हा ग्रंथही आधुनिक काळातील दुसरी 'फुले-स्मृती' आहे. प्राचीन काळातल्या 'मनु स्मृतीला', 'फुले-स्मृती' हा काटशह आहे. त्यावरील ती छत्तीस गुणी औषधी मात्रा आहे.[६]

या प्रमुख ग्रंथाखेरीज त्यांनी अखंडादी हा ग्रंथ लिहिला. काव्यरचना या ग्रंथातील ५ विभागांतील अभंगांच्याद्वारे त्यांनी धर्मसंस्था, कर्मकांड व भोंदूगिरी इत्यादी विषयांवर टीका केली आहे. एकीकडे प्रस्थापित धर्म आणि समाजव्यवस्था महात्मा फुले नाकारतात, तर दुसरीकडे श्रेष्ठतर जीवनमूल्यांचा ते स्वीकार करतात. सत्य, न्याय, माणुसकी, स्वातंत्र्य, समता, बंधुता यांसारख्या उदारमतवादी मूल्यांवर महात्मा फुले यांची नितांत निष्ठा आहे आणि ती त्यांनी लिहिलेल्या अखंडातून प्रत्ययकारी होऊन येते.

संत वाङ्मयाची विशेषत: संत तुकारामाची नाते सांगणाऱ्या या अखंडाची रचनाही लक्षणीय आहे. अल्पाक्षरत्वामधून अर्थपूर्ण सांगण्याची क्वचित तत्त्वचिंतनाच्या पातळीवर जाण्याची एक विलक्षण हातोटी महात्मा फुले यांनी साधली आहे. अंतरामीची सहजता आणि नेटक्या शब्दांचा वापर यातून या कवितांना आपोआपच एक मंत्रात्मक शक्ती प्राप्त होत जाते. रचना अभंग सदृश्य असली तरी पारलौकिकसंबंधी चिंतन करणारी असणे शक्य नाही. ती मानवमुक्ती, श्रेष्ठतर जीवनमूल्ये यांचा ध्यास घेणारी आणि त्यांचे स्वरूप सांगणारी अशी आहे. निसर्गामध्येच समतेची भावना असल्याने माणसामाणसांमध्ये भेद असणे महात्मा फुले यांना मान्य नाही. धर्म, राज्य यांसारख्या गोष्टी ही त्यांना निरर्थक वाटतात.

एक सूर्य सर्वा प्रकाशास देतो। उद्योगा लवितो प्राणीमात्रा।।१।।
मानवसहित प्राण्यांचे जीवन। सर्वांचे पोषण तोच करी।।२।।

सर्वां सुख देई जनकाच्या परी। नच घरी दूरी कोणी एका।।३।।

मानवाचा धर्म एकच असावा। सत्याने वर्तावा ज्योति म्हणे।।४।।

स्त्री पुरुषांमध्ये भेद असू नये;ख्रिस्त, मुसलमान, मांग, महार असे धर्म अगर जातीभेद असू नयेत. सर्व मानवांनी नीतीने आचरण करावे, सृष्टी समृद्ध आहे, तिचा उपभोग घेऊन समाधानाने रहावे. रंजल्या-गांजलेल्यांचे दु:ख दूर करावे. सद्विवेक सतत जागता ठेवावा अशा सारख्या गोष्टी ते आपल्या या अखंडातून प्रकट करतात. उद्योगप्रियता ही बाब त्यांना महत्त्वाची वाटते. स्वच्छता, गृहकृत्यदक्षता यांसारख्या गोष्टींचे महत्त्व ते प्रकट करतात. एकंदरीत सुखी आणि समृद्ध मानवजातीचे स्वप्न जणू ते अपेक्षितात.

समकालीन सामाजिक परिस्थिती आणि समकालीन राजकीय घटनांचाही ते अर्थ लावण्याचा प्रयत्न करतात.

स्त्री पुनर्विवाह करण्याची बंदी। अन्यायाची धुंदी । थांग नाही।।१।।

खोट्यानाट्या खते आर्यांणी करिती। लाच बहु खाती अन्यायाने।।२।।

अन्य शुद्र लोक पुराणे सांगती। बंड करविती हितासाठी।।३।।

अन्यायी ब्राह्मण बहु ठायी होती। दु:ख सर्वा देती। ज्योति म्हणे।।४।।

हे सांगत असताना प्रचलीत धर्मातील न्यूनही ते प्रकट करीत जातात. धर्म पुस्तकांमधील खोट्यानाट्या गोष्टी ते उघड करण्याचा प्रयत्न करतात.

उदा. कल्पनेचे देव कोरिले उंदड। रचीले पाखंड। हितासाठी।।१।।

किन्नर गंधर्व ग्रंथी नाचविले। अज्ञ कसविले। कृत्रिमाने।।२।।

निर्लज्य सोवळे त्याचे अधिष्ठान। भोंदिती निदान। शुद्रादीक ।।३।।

ब्राम्हणांनी नित्य होऊन नि:संग। शुद्र केले नंग। ज्योति म्हणे।।४।।

संत साहित्याशी नाते सांगणाऱ्या अखंडातून महात्मा फुले यांचे वास्तवाला थेटपणे भिडू पाहणारे व्यक्तिमत्त्व सहजपणे प्रकट होते. या रचना साध्या-सोप्या असल्या तरी अतिशय अर्थपूर्ण होत जातात. त्या त्यांच्यातील अल्पक्षरात्वामुळे अनुभवसमृद्ध व्यक्तिमत्त्वाच्या शब्दांना जो चिंतनाचा स्तर सहजपणे लाभतो तसेच येथेही होते.



सत्य सर्वांचे आदी घर। सर्व धर्मांचे माहेर।

जगामाजी सुख सारे। खास सत्याची ती पोरे।

सत्या सुखाला आधार। बाकी सर्व अंध:कार।

आहे सत्याचा बा जोर। काढी भंडाचा तो नीर।।२।।

सत्य आहे ज्याचे मूळ। करी धूर्तांची बाराळ।

बळ सत्याचे पाहुनी। बहुरुपती जळे मनी।।३।।

खरे सुख नट नव्हे। सत्य ईशा वर्जू पाहे।

ज्योति प्रार्थी सर्व लोकां। व्यर्थ डंभा पेटू नका।।४।।

सार्वजनिक सत्यधर्म पुस्तकाच्या प्रारंभी आलेला हा अभंग महात्मा फुले यांच्या व्यक्तिमत्त्वाची सर्व वैशिष्ट्ये प्रकट करणारा आणि एक भावकविता म्हणूनही अर्थपूर्ण असणारा असा आहे.

सामान्य माणसांमध्ये जागृती निर्माण व्हावी या तीव्र हेतूमुळे त्यांची भाषा साधी, सोपी प्रांजळ तरीही कोणाचा मुलाहिजा न ठेवणारी फटकळ रूप धारण करते.

❑❑❑

## संदर्भ व टिपा

१. हरी नरके (संपादक), महात्मा फुले : साहित्य आणि चळवळ, डॉ.बाबासाहेब, महात्मा फुले, राजर्षी शाहू चरित्र साधन प्रकाशन समिती, मुंबई २००६, पृ.२७२.

२. य.दि.फडके (संपादक), महात्मा फुले समग्र वाङ्मय, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई, १९९१, पृ.१०७.

३. डॉ.नागनाथ कोत्तापल्ले, ज्योतिपर्व, स्वरूप प्रकाशन, औरंगाबाद २०००, पृ.२२-२३.

४. अ.रा.कुलकर्णी, महात्मा ज्योतिराव फुले, सामाजिक आणि शैक्षणिक कार्य, डायमंड पब्लिकेशन्स, पुणे, २००८, पृ.२२-२३.

५. निर्मला नगर, ज्योतिराव फुलेंची समाज परिवर्तन नीती, साहित्यसेवा प्रकाशन, औरंगाबाद, १९९१, पृ.६०-६१.

६. महात्मा फुले गौरव ग्रंथ, महाराष्ट्र राज्य शिक्षण विभाग, मुंबई, १९८२, पृ.६७२.